# लोक महाविद्यालय, वर्धा

## समाजशास्त्र विभाग

## <u>अहवाल सत्र 2013 -14</u>

लोक महाविद्यालय, वर्धा येथील समाजशास्त्र विभागांतर्गत सन 2013-14 या शैक्षणिक सत्रामध्ये समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. समाजशास्त्र विभागातंर्गत अभ्यास मंडळाव्दारे समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना 'वृध्दांच्या सामाजीक समस्या' या विषयावर मार्गदर्शन करण्याकरिता प्रा. डॉ. दिलीप देशमुख यशवंत महाविद्यालय वर्धा यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन डॉ.कोटेवार सर सचिव लोक शिक्षण प्रसारक मंडळ वर्धा, तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणुन प्रा.श्री अमृतराव येऊलकर कोषाध्यक्ष लोकशिक्षण प्रसारक मंडळ वर्धा आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. तायडे मॅडम, प्रा.पाटणे सर उपस्थित होते.

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय वर्धा व्दारे आयोजीत 'मानव उध्दव उदविकास आणि जैव सांस्कृतिक विविधता प्रदर्शनी' ला लोक महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग आणि समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी दिनांक 07 सष्टेंबर 2013 रोजी भेट दिली. प्रदर्शनीमध्ये लाखो वर्षापुर्वीचे शारिरिक अस्तित्व, एक कोषी व बहू कोषी विभिन्न प्रकारचे असंख्य जीव यांच्या शारिरिक विभिन्नता, नर्मदा घाट व शिवलिंग क्षेत्रे यामधुन प्राप्त झालेले अस्थी अवशेष व विभिन्न प्रकारचे दगड उपकरण औजार, तसेच भारतातील प्राचीन मानवाचे अस्तित्व इत्यादी ऐतिहासिक बाबींचे दर्शन समाजशास्त्रातील विद्यार्थ्यांना झाले.

समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना सामाजिक समस्यांचे आकलन व्हावे या दृष्टीने समाजशास्त्र विभागाच्या वतीने श्रीछाया अनाथालय नालवाडी वर्धा येथे दिनांक 08 जानेवारी 2014 ला भेटीचे आयोजन करण्यात आलेले होते. सामाजीक समस्यांपैकी अनाथ बालकांच्या समस्येचा प्रश्न मोठा आहे. अशा अनाथ बालकांची देखभाल व त्यांना शिक्षण देऊन त्यांच्या भविष्याला दिशा देण्याकरिता श्रीछाया अनाथालय वर्धा यांच्या कार्याची माहिती समाजशास्त्रातील विद्यार्थ्यांना झाली. विद्यार्थ्यांनी अनाथ बालकांशी हितगुज साधुन, त्यांचे सोबत गाणे, नाटक, बोधकथा, कथा व विविध खेळ यांच्या माध्यमातुन अनाथ बालकांचे मनोरंजन करुन काही प्रमाणात त्यांचे दुःख दुर करण्याचा प्रयत्न केला.

समाजशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे सेमीनार आयोजीत करण्यात आले. त्याकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे मॅडम, प्रा. येऊलकर मॅडम, प्रा. डेहणे मॅडम व प्रा. उमाटे मॅडम यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

प्रा. अर्चना येऊलकर
समाजशास्त्र विभाग
लोक महाविद्यालय, वर्धा